महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

जा. क्रमांक : तंशिविकापु/विवि/परिस स्पर्श योजना/२०२३/ 4569 दिनांक 03 OCT 2023

**परिपत्रकः**

प्रति,
संचालक/प्राचार्य
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित
पदवी व पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था,
पुणे विभाग.

**विषय : राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदविका संस्थांचे एनबीए (NBA) तसेच नॅक (NAAC) मुल्यांकन करुन घेण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत...**

संदर्भः १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२२/प्र.क्र.२७९/विशि-३ दिनांक १९.०४.२०२३.

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १७/तंशिसं/आढावा बैठक/NBA/२०२३/२५६ दिनांक १५.०९.२०२३.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या तसेच शैक्षणिक गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदविका संस्थामध्ये शैक्षणिक गुणवत्ता वृध्दिंगत होण्याकरीता शिखर परिषदा व राज्य शासनाकडून वेळोवेळी निर्देश देण्यात येतात. त्याअनुषंगाने सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांचे एनबीए (NBA) तसेच नॅक (NAAC) मुल्यांकन करुन घेण्याबाबत या विभागीय कार्यालयामार्फत वेळोवेळी सूचित करण्यात आलेले आहे. मात्र वारंवार सूचना देऊनही अद्यापपर्यंत सरासरी १० टक्के संस्थांचे मुल्यांकन झाल्याचे निदर्शनास आले आहे. यासंबंधात संथ गतीने होणा-या प्रगतीबाबत विभागीय कार्यालयांच्या आढावा बैठकीत मा. मंत्री महोदयांनी नाराजी व्यक्त केलेली असून, या पार्श्वभूमीवर संस्थांमधील गुणवत्ता सुधारण्याच्या अनुषंगाने त्यांनी बैठकी दरम्यान खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

- संस्थांमधील शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याच्या अनुषंगाने जून २०२४ अखेर पर्यंत सर्व पात्र व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी तसेच पदविका संस्थांचे एनबीए (NBA) तसेच नॅक (NAAC) मुल्यांकन करुन घेण्याबाबत ठोस प्रयत्न करण्यात यावेत.
- संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यांत आलेल्या परिस स्पर्श योजनेंतर्गत अद्यापपर्यंत मुल्यांकन न झालेल्या संस्थांचे एनबीए (NBA) तसेच नॅक (NAAC) मुल्यांकन करण्याची कार्यवाही जलद गतीने कार्यान्वित करावी.

आढावा बैठकी दरम्यान मा. मंत्रीमहोदयांनी, ज्या संस्था मुल्यांकन करुन घेण्यासाठी प्रयत्न करणार नाहीत त्यांचेवर खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे सूचित केलेले आहे.

१. पदवी संस्थांच्या बाबतीत The Maharashtra Public University Act-2016 तसेच पदविका संस्थांच्या बाबतीत Maharashtra State Board of Technical Education Act-1997 नुसार कार्यवाही करण्यासाठी संबंधित प्राधिकरणाकडे प्रस्तावित करण्यांत यावे.

२. NBA/NAAC मानांकन नसणा-या संस्थांची यादी तयार करुन ती संबंधित प्राधिकरण तसेच संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत यावी.

३. NBA/NAAC करीता पात्र असूनही संबंधित पोर्टलवर नोंदणी न करणा-या संस्थांमधील प्रवेश क्षमतेत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये घट करण्यासाठी संबंधित प्राधिकरणाकडे प्रस्तावित करण्यात यावे. तसेच अशा संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यतेची शिफारस करण्यांत येऊ नये.
४. संस्थांचे एनबीए (NBA) तसेच नॅक (NAAC) मुल्यांकन नसल्यामुळे संस्थांमधील विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहिल्यास त्यास संबंधित संस्थेस जबाबदार धरण्यांत यावे.

मा. मंत्री महोदयांच्या उपरोक्त सूचना तसेच निर्देश विचारात घेता आपणांस सूचित करण्यात येते की, एनबीए (NBA) तसेच नॅक (NAAC) मुल्यांकन न केल्यास होणा-या गंभीर परिणामांची सर्व संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी व सदर मुल्यांकन प्राप्त करण्याकरीता यापुढे विभागीय कार्यालयामार्फत दिलेल्या सूचनांचे पालन करावे व संस्थेने आवश्यक पुढाकार घेऊन संस्थेचे एनबीए (NBA) तसेच नॅक (NAAC) मुल्यांकन करुन घ्यावे.

सोबत : संदर्भिय शासन निर्णय.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रतः
१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई (कार्यासन क्र. १७)
२. प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना - या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरीता.

**उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने राज्यातील नॅक/ एनबीए मुल्यांकन न झालेल्या महाविद्यालयाचे नॅक/ एनबीए मुल्यांकन करुन घेण्यासाठी त्यांना मार्गदर्शन व सहकार्य मिळण्यासाठी परिस स्पर्श योजना सुरु करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२२/प्र.क्र.२७९/विशि-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
४ था मजला, मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १९ एप्रिल, २०२३

**<u>प्रस्तावना-</u>**

राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद किंवा NAAC प्रमाणन हे देशातील उच्च शिक्षण संस्थाकडून दिल्या जाणा-या शिक्षणाच्या तर नॅशनल बोर्ड ऑफ अँक्रेडिटेशनचे NBA प्रमाणन हे तंत्रशिक्षण संस्थांकडून दिल्या जाणा-या शिक्षणाच्या मानकाचे मूल्यांकन करुन गुणवत्तापुर्ण शिक्षणाची हमी देणारे परिमाण म्हणून परिभाषित केले जाते. अध्यापन-अध्ययन पद्धतींचे नियतकालिक मूल्यांकन करणे, संशोधन आणि सिद्ध शैक्षणिक तंत्रांचा वापर करुन शैक्षणिक वातावरण निर्मिती करणे, स्वायत्तता, स्व-मूल्यांकन, नाविन्यपुर्ण उपक्रम या संकल्पनांना प्रोत्साहन देणे, विद्यार्थ्यांसाठी संशोधन आणि प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेणे, लाभार्थ्यांच्या सहयोगाने व त्यांच्या अभिप्रायानुसार कार्यामध्ये सुधारणा करणे. याद्वारे शैक्षणिक संस्थांमध्ये "उत्कृष्टतेचा शोध" विकसित करणे, विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक वातावरणात शिकण्यास मदत करण्याचे कार्य नॅक तसेच एनबीए करते.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे हा महत्वाचा मुद्दा असून शैक्षणिक गुणवत्ता वाढीच्या अनुषंगाने महाविद्यालयांचे नॅक करणे आवश्यक आहे. संचालक, उच्च शिक्षण यांनी सर्व महाविद्यालयांना ६ महिन्याच्या कालावधीत नॅक मुल्यांकनासाठी नोंदणी करण्याच्या व पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना केलेल्या आहेत.

राज्यामध्ये १० विद्यापीठांतर्गत एकूण ३३४६ महाविद्यालयांपैकी केवळ १३६८ महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन/ पुनर्मुल्यांकन झालेले असून सद्यस्थितीत एकूण १९७८ महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन झालेले नसल्याचे तसेच राज्यातील एकूण ७८६ तंत्रशिक्षण महाविद्यालयांपैकी ७०४ महाविद्यालयांचे एनबीए मुल्यांकन झालेले नसल्याचे निदर्शनास आले आहे. दिनांक १४.११.२०२२ रोजी मुंबई विद्यापीठामध्ये महाविद्यालयांचे प्राचार्य/ संस्था संचालक यांच्यासमवेत नॅक संदर्भात कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेस नॅक चे अध्यक्ष सुद्धा उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेमध्ये महाविद्यालयांना/ संस्था संचालकांना स्थानिक स्तरावर मार्गदर्शनाची व हॅन्ड होल्डींगची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यानुषंगाने, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या PARAMARSH योजनेच्या धर्तीवर राज्यातील नॅक मुल्यांकन न झालेल्या महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन होण्याच्या दृष्टीने **परीस- स्पर्श** योजना सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदर योजनेस मंत्रिमंडळाच्या दिनांक ०५ एप्रिल, २०२३ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

**<u>शासन निर्णय</u>-**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या PARAMARSH योजनेच्या धर्तीवर राज्यातील नॅक मुल्यांकन न झालेल्या महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन होण्याच्या दृष्टीने **परीस- स्पर्श** योजना सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर **योजनेचे स्वरुप** खालीलप्रमाणे आहे.

सदर योजनेचा कालवधी तीन वर्ष राहील.

या योजनेंतर्गत नॅक/ एनबीए मुल्यांकन आणि प्रमाणिकरण असलेले व अनुकरणीय रेकॉर्ड असलेले महाविद्यालय हे मार्गदर्शक (मेंटॉर) म्हणून नियुक्त केले जातील. उच्च शिक्षण महाविद्यालयांसाठी १५० तसेच, तंत्रशिक्षण महाविद्यालयांसाठी ७५ मेंटॉर महाविद्यालये अपेक्षित आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाद्वारे प्रतीवर्षी प्रत्येकी ५ ते ७ नॅक/ एनबीए मुल्यांकन न झालेल्या (मेंटी) संस्था/ महाविद्यालय याप्रमाणे योजना कालावधीत (तीन वर्षात) प्रत्येकी १५- २० संस्थाचे/ महाविद्यालयांचे नॅक/ एनबीए मुल्यांकन करणे अपेक्षित आहे. त्यानुसार मेंटॉर व मेंटीचे मॅपींग केले जाईल

निश्चित करण्यात आलेल्या मेंटॉर महाविद्यालयांना महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकादमी (MSFDA), पुणे मार्फत प्राथमिक प्रशिक्षण देण्यात येईल.

मार्गदर्शक म्हणून काम करणा-या संस्था (मेंटॉर) मुल्यांकन व प्रमाणिकरण न झालेल्या महाविद्यालयांसाठी मुल्यांकन व प्रमाणिकरण परिचय कार्यक्रम घेऊन महाविद्यालयांना (मेंटी) वेळेवर मुल्यांकन व प्रमाणिकरण करुन घेण्यासाठी मार्गदर्शन करतील जेणेकरुन देशातील उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढेल.

त्यामध्ये, मुल्यांकन व प्रमाणिकरण न झालेल्या महाविद्यालयाचे प्राचार्य/ संस्था संचालक यांना एक दिवसीय प्रशिक्षण देण्यात येईल

महाविद्यालयातील IQAC सदस्य/ विभाग प्रमूखांना नॅक/ एनबीए मुल्यांकन प्रक्रीयेच्या अनुषंगाने प्रशिक्षण देण्यात येईल

महाविद्यालयातील IQAC सदस्य/ विभाग प्रमूखांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात येईल ज्यामध्ये नॅक मुल्यांकनाच्या निकष निहाय चर्चा व अडचणी निवारणासाठी उपाययोजनाबाबत संवाद करण्यात येतील.

मेंटॉर महाविद्यालयाचे IQAC सदस्य नॅक/ एनबीए मुल्यांकन न झालेल्या (मेंटी) महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देतील (३ ते ४) भेटी दरम्यान नॅक/ एनबीए मुल्यांकनासाठी आवश्यक ते दस्तऐवजीकरण व सादरीकरण याबाबत मार्गदर्शन करतील.

यासर्व प्रक्रीयेनंतर मेंटॉर महाविद्यालय व मेंटी महाविद्यालये यांनी नॅक मुल्याकन व प्रमाणिकरण होण्यासाठी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मेंटॉर महाविद्यालयाकडून सादर केला जाईल.

३. **योजनेची अंमलबजावणी-**

सदर योजना राबविण्यासाठी राज्य सल्लागार समिती, विद्यापीठ स्तरीय समिती आणि विद्यापीठामार्फत ठरविल्याप्रमाणे जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात येईल.

**राज्य सल्लागार समिती** - मा. प्रधान सचिव/ सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सल्लागार समितीचे गठण करण्यात येईल. योजनेच्या अंमलबजावणीचे निरिक्षण व पुनरावलोकन करणे तसेच अंमलबजावणीच्या अनुषंगाने येणा-या अडचणींचे निराकरण करणे व योजनेसाठी आवश्यक ती वित्तीय तरतूद उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करणे हे या समितीचे मुख्य कार्य असेल.

**विद्यापीठ स्तरीय समिती**- संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु /प्र-कुलगुरु पदापेक्षा कमी दर्जा नसलेले कुलगुरुंनी नामनिर्देशित केलेली व्यक्तीच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ स्तरीय समिती गठीत करण्यात येईल.

विद्यापीठामार्फत गठीत करण्यात येणा-या जिल्हास्तरीय समितीला सर्वतोपरी मार्गदर्शन करणे, त्यांना जिल्ह्यातील महाविद्यालयांची माहिती उपलब्ध करुन देणे, योजना राबविण्यासाठी जिल्हास्तरीय समितींना निधी उपलब्ध करुन देणे. जिल्हास्तरीय समितीच्या कामकाजाचे पुनरावलोकन करणे आणि विद्यापीठाच्या परिक्षेत्रांतर्गत जिल्ह्यातील जिल्हास्तरीय समित्यांमध्ये समन्वय साधणे. अशी कार्ये विद्यापीठ स्तरीय समिती करेल.

**जिल्हास्तरीय समिती-** ए श्रेणीचे नॅक/एनबीए मुल्याकन असलेल्या महाविद्यालयाचे प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठामार्फत जिल्हास्तरीय समितीचे गठण करण्यात येईल.

सदर समिती ही या योजनेच्या अंमलबजावणीची मुख्य समिती आहे. मार्गदर्शक संस्थाची (मेंटॉर) तसेच नॅक/ एनबीए मुल्यांकन न झालेल्या महाविद्यालयांची (मेंटी) यांची निवड करणे, त्यांमध्ये करारनामे तयार करणे, मेंटॉर संस्थांकडून केल्या जाणा-या कार्यांबाबत मार्गदर्शन करणे त्यांचा आढावा घेऊन योजनेच्या प्रगतीबाबत दरमहा अहवाल विद्यापीठस्तरीय समितीला सादर करणे. अशी कार्ये ही समिती करेल.

मार्गदर्शक संस्थाची (मेंटॉर) निवड करण्यासाठी खालीलप्रमाणे निकष असतील:-

१. नॅक चे ए किंवा त्यापेक्षा अधिक चे मुल्यांकन असलेले जिल्ह्यातील महाविद्यालय.
२. ए किंवा त्यापेक्षा अधिकचे मुल्यांकन असलेले महाविद्यालय उपलब्ध न झाल्यास जिल्हास्तरीय समिती नॅक चे बी+ मुल्यांकन असलेल्या महाविद्यालयाची मार्गदर्शक संस्था म्हणून निवड करु शकेल.
३. एनबीए चे ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुणांक प्राप्त महाविद्यालय/ संस्था.
४. जर उपरोक्त मुद्दा क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे महाविद्यालय/ संस्था उपलब्ध न झाल्यास जिल्हास्तरीय समिती जास्तीत जास्त एनबीए गुणांक प्राप्त महाविद्यालय/ संस्थेची मार्गदर्शक संस्था म्हणून निवड करु शकेल.

नॅक/ एनबीए मुल्यांकन न झालेली सर्व महाविद्यालये/ संस्था ( शासकीय/ अशासकीय अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित (कायम विनाअनुदानित)) मेंटी संस्था/ महाविद्यालये म्हणून ओळखल्या जातील.

४. या योजनेंतर्गत खालीलप्रमाणे आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येईल:-

अ) या योजनेंतर्गत उच्च शिक्षण संस्थासाठी अपेक्षित केलेले मेंटॉर महाविद्यालये व महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकादमी (MSFDA), पुणे यांचेकडून घेण्यात येणारे परिचय कार्यक्रम, प्रशिक्षण शिबीर, कार्यशाळा, प्रत्यक्ष भेटी व अहवाल सादरीकरण यासाठी त्यांना सहायक अनुदान स्वरुपात एकूण रु.२,००,०००/- प्रती वर्ष देण्यात येईल. त्यामध्ये शासनस्तरावरुन रु.१,००,०००/- (रुपये एक लक्ष फक्त) व संबंधित विद्यापीठाकडून रु.१,००,०००/-(रुपये एक लक्ष) निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. एकूण निधीपैकी ५ टक्के निधी महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकादमी (MSFDA), पुणे यांना देण्यात येईल.

१. नॅक / एनबीए मुल्यांकन प्रक्रीयेच्या अनुषंगाने संस्था संचालक/ प्राचार्य/ विभाग प्रमूखांना परिचय कार्यक्रम (एक दिवस) रु.१२,०००/-

२. महाविद्यालयातील IQAC सदस्य/ विभाग प्रमूखांसाठी कार्यशाळेचे आयोजन (एक दिवस) एकूण रु.२५०००/-

३. महाविद्यालयातील IQAC सदस्य/ विभाग प्रमूखांसाठी नॅक/ एनबीए मुल्यांकनासाठी आवश्यक त्या दस्तऐवजीकरणाबाबत कार्यशाळेचे आयोजन (एक दिवस)रु.२५०००/-

४. महाविद्यालयातील IQAC सदस्य/ विभाग प्रमूखांसाठी नॅक/ एनबीए मुल्यांकनासाठी आवश्यक निकषनिहाय मार्गदर्शनासाठी कार्यशाळेचे आयोजन (दोन दिवस) एकूण रु.७४,०००/-

५. मेंटॉर महाविद्यालयाचे IQAC सदस्य नॅक/ एनबीए मुल्यांकन न झालेल्या (मेंटी) महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देतील (३ ते४) रु.६०,०००/-

६. यासर्व प्रक्रीयनंतर मेंटॉर महाविद्यालय व मेंटी महाविद्यालये यांनी नॅक/ एनबीए मुल्यांकन व प्रमाणिकरण होण्यासाठी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मेंटॉर महाविद्यालयाकडून सादर केला जाईल रु.४,०००/-

उच्च शिक्षण संस्थांसाठी अपेक्षित केलेल्या १५० मेंटॉर महाविद्यालयांसाठी प्रती वर्षी रु.३.०० कोटी अनुदान तर पुर्ण योजना कालावधीसाठी एकूण रु.९.०० कोटी अनुदान देण्यात येईल. त्यापैकी, रु.४.५० कोटी खर्च शासनस्तरावरुन तसेच रु.४.५०कोटी खर्च विद्यापीठ स्तरावरुन (विद्यापीठ निधीतून) खर्च करण्यात येईल.

ब) तंत्रशिक्षण संस्थांसाठी अपेक्षित केलेल्या ७५ मेंटॉर महाविद्यालयांसाठी व महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकादमी (MSFDA), पुणे यांचेसाठी उपरोक्त -अ॰ मध्ये नमूद केलेल्या प्रयोजनासाठी प्रती वर्षी रु.१.५० कोटी तर पुर्ण योजना कालावधीसाठी एकूण रु.४.५० कोटी सहायक अनुदान देण्यात येईल. हा संपुर्ण खर्च शासनस्तरावरुन करण्यात येईल.

पूर्ण योजना कालावधीसाठी उच्च व तंत्रशिक्षण संस्थांसाठी व महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास (MSFDA), पुणे यासाठी एकुण रु.१३.५० कोटी खर्च अपेक्षित असून यापैकी या शासनस्तरावरुन रु.९.०० कोटी निधी व ४.५० कोटी निधी विद्यापीठ स्तरावरुन उपलब्ध करुन देण्यात येईल.

एकूण निधीपैकी ५ % निधी महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकादमी (MSFDA), पुणे ला प्राथमिक प्रशिक्षण व प्रशासकीय खर्चासाठी वितरीत करण्यात येईल.

५. सदर शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०४१९१८५७४११३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(अजित बाविस्कर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई.
३. कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे
४. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे
५. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. राज्य प्रकल्प संचालक, राज्य प्रकल्प संचालनालय, रुसा, मुंबई
८. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकादमी (MSFDA), पुणे
९. सहसंचालक, उच्च शिक्षण, सर्व विभागीय कार्यालये.
१०. सर्व सह/उप सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. निवड नस्ती (विशि-३) , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.